जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 JUL 2019
तरूण भारत




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीतशास्त्र विभागाशेजारील तलावावरून गेलेल्या रस्त्याचे सुशोभीकरण केले जात आहे. त्यासाठी काही लाख रुपयांची तरतूद केली आहे. तलावाचे रूप पालटून टाकणाऱ्या या सुशोभीकरणात सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला आहे. विद्यार्थी या पॉईंटला भेट देऊन सेल्फीचा आनंद घेत आहे. (छाया : रियाज ट्रेनर)



केंद्रसरकारच्या यंदाच्या अर्थसंकल्पात नवीन शैक्षणिक धोरण प्रभावीपणे अंमलात आणण्याचा संकल्प करण्यात आला आहे. उच्च शिक्षण आयोगाची स्थापना नॅशनल रिसर्च फाउंडेशनच्या माध्यमातून करून संशोधनासाठी पायाभूत व भौतिक सुविधा पुरवण्यात येणार आहेत. जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी ४०० कोटींचा निधी देण्यात येणार आहे. परदेशी विद्यार्थी भारतात शिक्षणासाठी यावेत यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. जगातील सर्वोत्कृष्ठ २०० संस्थांमध्ये देशातील संस्था समाविष्ठ व्हाव्यात यासाठी काही योजना प्रस्तावित आहेत. एकंदरीत जगातील सर्वाधिक तरूणांचा देश म्हणून ओळखला जाणाऱ्या भारताच्या प्रगतीचा रोडमॅप दर्शवणारा व उच्च शिक्षणाला चालना देणारा हा अर्थसंकल्प आहे.

डॉ. देवानंद शिंदे,
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

## शिक्षणाला चालना



अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार उच्च शिक्षण आयोगाची स्थापना, नॅशनल रिसर्च फाऊंडेशनच्या माध्यमातून संशोधनासाठी पायाभूत व भौतिक सुविधा पुरवण्यात येणार आहेत. जागतिक दर्जाचे शिक्षणासाठी ४०० कोटींचा निधी तसेच विदेशातून विद्यार्थी यावेत यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. जगातील टॉप २०० विद्यापीठांत भारतीय विद्यापीठ, आयआयटी, आयआयएससारख्या संस्था याव्यात, यासाठी प्रयत्न असल्याचा संकल्प करण्यात आला आहे.

– **डॉ. देवानंद शिंदे**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 JUL 2019

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठामध्ये डिप्लोमा इन ई-बिझनेस' कोर्ससाठी प्रवेश सुरू

**कोल्हापूर ◈ प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए अधिविभागामध्ये डिप्लोमा इन ई-बिझनेस' हा एक वर्ष कालावधीमधील डिप्लोमा कोर्स हा शैक्षणिक वर्ष सन २०१८ -२०१९ पासून सुरू करण्यात आलेला आहे. शैक्षणिक वर्ष सन २०१९ -२०२० मधील कोर्स ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या नेक्स इमारतीमधून अर्ज घेऊन दि. १० जुलै २०१९ पर्यत विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरावयाचे आहेत. मपी.जी.डिप्लोमा इन ई-बिझनेस' या कोर्स ला कोणत्याही विषयाचे पदवीधारक विद्यार्थी, नोकरदार वर्ग, व्यावसाईक या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेवू शकतात.

सदरच्या कोर्सच्या अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी एम.बी.ए अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संपर्क क्रमांक : २६०९३६४ /२६०९३७५ येथे संपर्क साधावा अथवा विद्यापीठाच्या unishivaji.ac.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. विद्यार्थ्यानी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. एच. एम. ठकार, संचालक, एम. बी. ए अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी केले आहे.